पूरग्रस्त समुदायामध्ये सुसंगतता वर्धन

Archana Srivastava and Bijay Prakash

पूर आला व शेतात गाळ जमला की शेती करणे हे एक आव्हान ठरते. हवामानामुळे शेतकरी हवालदिल होतो. त्याची उपजीविका कठीण होते. तांत्रिक सहाय्य, हवामानाचा डिजिटल पद्धतीने मिळणारा अंदाज व इंटरनेटद्वारा शिक्षण–प्रशिक्षण यामुळे सुसंगतता वाढली व 'निशा'सारख्या शेतकरी स्त्रीचे नशीब बदलले.

बिहार राज्यातील पश्चिम चंपारण्य जिल्ह्यातील अनेक खेड्यामध्ये १, बाघा २, मधुबनी, भिताह, पिपरसी ब्लॉक तसेच उत्तर प्रदेशातील महाराजगंज व कुशीनगर जिल्ह्यातील निचलूल व खाड्डा ब्लॉक हे गंधक नदीच्या तीरावर वसलेले आहेत व बंधाऱ्याजवळ आहेत. त्यांच्या बस्ती व नदीमधे तटबंध नाहीत. त्यामुळे दरवर्षी पूर येणे व पाणी साठून राहणे या समस्यांना तोंड द्यावे लागते. जवळच्या पहाडी प्रदेशातून येणारे वाहते पाणी व जोरदार पाऊस यामुळे खरीप पिकांचे व हंगामी भाजीपाल्यांच्या पिकाचे नुकसान होते. वाल्मिकी अभयारण्य ही जवळच असल्याने वन्यप्राणी देखील या भागात भरपूर आहेत.

खेड्यातील अनेक रहिवाश्यांचा शेती हाच उत्पन्नाचा प्राथमिक स्त्रोत आहे. परंतु केवळ १५ ते २०% क्षेत्रात, खरीपाच्या हंगामात गहू, मोहरी, मसूर ही पिके घेतली जातात तर रब्बीच्या मोसमात भाज्यांची लागवड केली जाते. जवळपास सहा महिने पाणी साठलेले असते. त्यामुळे धानाची लागवड करणे कठीण जाते. या भागातील मुख्य पीक ऊस हे आहे. शेतकऱ्यांना त्यांचा ऊस दोन स्थानिक कारखान्यांना किंवा इतर विक्रेत्यांना विकावा लागतो व उत्पन्न कमी मिळते. उत्तर प्रदेशातील कुशीनगर जिल्ह्यातील गूळ उत्पादकांनाही शेतकरी ऊस विकतात परंतु फार दर मिळत नाही.

२०१८ मध्ये गोरखपूर पर्यावरण कृती गट (GEAG) या सेवाभावी संस्थेने पश्चिम चंपारण्यमधील राजवटीया या खेड्यात काम सुरू केले. समुदायात सुसंगता निर्माण करण्यासाठी अनेक प्रयत्न सुरू केले. यांनी सहाय्य केलेल्या सामूहिक सीमापार पूर सुसंगतता प्रकल्प, गंधक नदी खोरे या अंतर्गत अनेक प्रयत्न केले गेले. यामध्ये गावपातळीवर संस्था निर्माण केल्या जसे – ग्राम संकट निवारण समिती, शेतकरी क्षेत्रशाळा, स्वमदत गट इत्यादी. श्रीमती निशादेवी यांना या प्रकल्पाचा लाभ झाला त्याची माहिती खाली देत आहे.



शाश्वत शेती पद्धती वापरल्यामुळे कलिंगडचे चांगले पीक शक्य झाले.

निशादेवी : एक आदर्श

निशादेवी या बिहारमील चंपारण्य जिल्ह्यातील राजवाटिया या खेड्यात राहतात. त्यांच्या मालकीची १.५ एकर जमीन लागवडी योग्य आहे. त्यापैकी ०.४ एकर जमीन ही गंधक नदीजवळील पुराच्या व पाणी साचणाऱ्या जागेजवळ आहे. त्यांचे शेत सहा महिने पाण्याखाली बुडलेले असायचे. त्यामुळे कुटुंबाला पुरेसे अन्न उत्पादन करता येईल ही आशा नसायची. त्यामुळे निशा यांचे पती दिल्ली, बंगलोर यासारख्या महानगरात उपजीविकेरिता जात असत.

२०२० मध्ये कोव्हिड १९च्या साथीच्या काळात निशा यांना कठीण प्रसंगाला सामोरे जावे लागले. जून महिन्यात त्यांच्या शेतात पुराचे पाणी शिरले व उभे पीक नष्ट झाले. त्यांच्या पतीला कोव्हिडच्या साथीमुळे परत यावे लागले व त्यांची स्थिती अधिक बिकट झाली.

निशादेवी GEAG गटाच्या सदस्यांना फोकस ग्रुप डिक्सशन FGD सभेच्या दरम्यान भेटल्या. तेथे त्यांना सोप्या पण ठोस अशा सुसंगतता योजनांची माहिती मिळाली, ज्याद्वारे पूरग्रस्त भागात शेतीचा विकास होतो. तागापासून पिशव्या तयार करणे, बांबूपासून वस्तू बनविणे, मातीचे ढीग तयार करणे, बंधाऱ्याची शेती, रोपवाटिका निर्माण करणे, गादी वाफा तयार करणे अशा बाबींचा यामध्ये समावेश होतो. निशादेवीने शेतकऱ्यांच्या कार्यशाळेत सहभाग घेतला व त्यांना त्यांचे परिणाम समजले. मटका खते व कीटकनाशके यांचा पर्यावरणाच्या दृष्टीने फायदा व दीर्घकालीन आरोग्यप्राप्तीचे लाभ त्यांना लाभले. मटका खते व कीटकनाशके तयार करण्याच्या पद्धती त्यांना समजल्या. GEAG टीमकडून FFSच्या प्रशिक्षणादरम्यान शिकलेल्या विविध तंत्राांचा त्यांनी त्यांच्या शेतात वापर केला. व्हॉटस्ॲप, एसेमेस द्वारा मिळालेल्या माहितीचा वापर करीत व सार्वजनिक ठिकाणी लावलेल्या फलकावरील सूचनांप्रमाणे त्यांनी शेतीतील कामाचे योग्य नियोजन केले.

सप्टेंबर २०२० मध्ये त्यांना ऑयस्टर मशरूम लागवडीबाबत GEAG प्रकल्प चमूद्वारे माहिती मिळाली व त्यांनी विविध थरांच्या १८ पिशव्या तयार केल्या, ज्यांची किंमत १२५० रुपये होती. चाळीस दिवसानंतर त्यांनी ७



किलो मशरूम उत्पादन घेतले ज्याची किंमत ८४० रु. होती. त्यानंतर दर तिसऱ्या किंवा चवथ्या दिवशी मशरूम येऊ लागले. डिसेंबरपर्यंत एकूण ४५ किलो मशरूम उत्पादन झाले. कुटुंबाकरिता त्यांनी १५ किलो मशरूम वापरले. ज्यामुळे त्यांना पौष्टिक आहार मिळाला. उर्वरित ३० किलो मशरूम १५० रु. प्रति किलो या दराने विकून त्यांनी ४५०० रु. उत्पन्न मिळवले. अशा प्रकारे तीन महिन्यातच निशादेवी निश्चित उत्पन्न मिळवू शकल्या.

FSS प्रशिक्षणात शिकलेली शेतीची नवी तंत्रे व शेतकी सल्ला यांचा वापर करून निशादेवी यांनी भाज्यांची लागवडही सुरू केली. त्यांच्या ०.३० एकर जमिनीवर रब्बी हंगामात त्यांनी मेथी बिया पेरल्या. दोन ओळीत लसूण व बंधाऱ्याच्या शेतात मळ्यांची लागवड केली. त्यांना ७.५ क्विंटल लसणू, ३.८ क्विंटल मेथी व ६० किलो मुळे प्राप्त झाले. या तीन पिकांमुळे त्यांना दहा हजारापेक्षा अधिक उत्पन्न मिळाले. मटका खते व कीटकनाशके वापरल्याने उत्पादन खर्च १९८० रुपयापेक्षा कमीच होता.

आंतरपिके पद्धतीचा वापर करून त्यांना अधिक उत्पन्न मिळाले. भेंडीसोबत लसणाचे पीक, घोसाळ्यांसोबत मक्याचे पीक त्यांनी घेतले. त्यांना यातून १२,६०० रुपये अधिकचे उत्पन्न मिळाले. पुढे त्यांनी १.१ क्विंटल घोसाळे (गिलके) व १.५ क्विंटल भेंडीचे पीक घेतले व बाजारात विकून ७८०० रु. मिळवले.

निशादेवी सांगतात, ''हे यश बघून माझ्या पतीने मला शेतीच्या कामात मदत करणे सुरू केले. यामुळे डिसेंबर महिन्यात गाळाच्या एक एकर जमिनीवर शेती करण्याचे मला प्रोत्साहन मिळाले. जमिनीची सुपीकता पुन्हा प्राप्त व्हावी यासाठी आम्ही शेती आधारित विविध तंत्रे स्वीकारली. यामध्ये स्वतः तयार केलेले खत, ओळ पेरणीची पद्धत, स्थानिक झाडांची पाने वापरून जमिनीतील ओल टिकवणे इत्यादींचा समावेश आहे.''

एक इंच खोल, बारा इंच परीघ असलेला खड्डा त्यांनी खोदला. घोसाळे, दुधी भोपळा यासोबत ओळ पेरणी पद्धतीने (जमिनीच्या एका बाजूने २ मीटर अंतर ठेवून) टरबूज पीक घेतले. जमिनीतील ओल टिकवण्यासाठी त्यांनी (कलिंगडाच्या) टरबूजाच्या फांद्या कापून अर्धा इंच जाड थर संपूर्ण शेतात दिला. यामुळे सिंचनाचा, तण कापणीचा खर्च त्यांनी वाचवला. कारण आवरण घातल्याने शेतात तण जमा झाले नाही. या पद्धतीने पिकांचा माती, वाळू यांच्याशी संपर्क न आल्याने पिकांना कीड लागण्याची शक्यता कमी झाली.

हवामानासंबंधी माहितीचा वापर करून त्यांनी सिंचनाचा खर्च वाचवला व पावसामुळे होणारे नुकसान टाळले. लॉकडाऊनच्या काळात, त्यांच्या या गाळसाची जमिनीतून यांनी टरबूज (कलिंगड), घोसाळे (गिलके) दुधी भोपळे (लौकी) विकून २८५००.०० रुपये मिळवले.

आज निशादेवी या राजवाटिया खेड्यातील प्रशिक्षक बनल्या आहेत. मशरूम उत्पादनाच्या सोप्या पद्धतीमुळे त्या आनंदाने व अभिमानाने मशरूम शेती हा उत्पन्नाचा पर्यायी स्त्रोत म्हणून सांगतात. त्या सांगतात, ''शेतकऱ्यांची सामाजिक, आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी मशरूम लागवड सक्षम आहे व ग्रामीण भागातील सुशिक्षित व अशिक्षित यांच्या रोजगाराची समस्या सोडवण्यात सहाय्य करण्याची क्षमता मशरूम लागवडीत आहे. त्या असे सांगतात की, स्त्रियांकरिता हे एक वरदान ठरेल. हा स्त्री स्नेही व्यवसाय आहे. घरातील जबाबदाऱ्या सांभाळून त्या वेळेचा सदुपयोग करू शकतात.''

हवामानाचा अंदाज कळणे व शेतकी सल्ला यांची त्यांना मदत झाली. हंगामी पिकांचे नियोजन करणे व निर्णय घेणे त्यामुळे सुलभ झाले. गाळ साचलेल्या जमिनीवर लागवड करण्यात निशादेवी यशस्वी झाल्या. पर्यावरण बदल सुसंगत पद्धतीचा वापर करून व डिजिटल तंत्रज्ञान वापरून, नैसर्गिक संसाधनांचा वापर करून त्या इतर शेतकऱ्यांसाठी एक आदर्श ठरल्या आहेत.



आंतरपिके घेऊन निशादेवीने जास्तीचे उत्पन्न घेतले.

Archana Srivastava
Project Coordinator
E-mail: archanasri844@gmail.com

Bijay Prakash
Environmental Planner
E-mail: bijay.plan@gmail.com
Gorakhpur Environmental Action Group
224, Purdilpur, M G College Road
Gorakhpur - 273 001, Uttar Pradesh
INDIA
www.geagindia.org

मराठी अनुवाद : विनीता हिंगे

Source : *Enhancing resilience of flood affected communities, LEISA India, Sepetember 2022*